# सुशिक्षित बेरोजगार तरूण व तरूणींचा व्यवसाय विषयक समायोजनात्मक समस्यांचे अध्ययन

**डॉ. विजया एन.कन्नाके** [१]
सहाय्यक अधिव्याख्याता
जे.एम.पटेल कॉलेज,भंडारा

**डॉ.रोमी बिष्ट** [२]
शारीरिक शिक्षण संचालक
जे.एम.पटेल कॉलेज,भंडारा

---

**सारांश :**

दिवसेंदिवस बेरोजगारीचे प्रमाण हे वाढतच चालले आहे. आधीच्या काळात बोटावर मोजता येईल एवढेच शिक्षितांचे प्रमाण आढळत होते. परंतु आताच्या काळात मात्र शिक्षितांचे प्रमाण हे वाढलेले आढळते त्यामुळे लोकसंख्येच्या तुलनेत नौकरीचे पद मात्र कमी असल्याचे आढळते. त्यामुळे स्पर्धाचे प्रमाण वाढतांना आढळते.स्पर्धा वाढल्याने बेरोजगारीचे प्रमाण वाढलेले आढळते.बेरोजगारी वाढल्याने कित्येक तरूण नैराश्य, मानसिक ताण तणाव,व्यसनाधीनता अश्या समस्यांना तोंड देतांना आढळतात.जीवन जगण्यास पैसा आवश्यक असल्या कारणाने नाईलाजाने का होईना उच्च शिक्षित तरूण असुन देखिल स्वयंरोजगार करू लागले आहेत. त्यांच्या तोलामोलाचा हुद्दा प्राप्त होत नसला तरी रिकामे राहण्यापेक्षा बरा या भावनेतुन त्याचा स्वीकार केला जातो. सर्वात शेवटी मात्र स्वयंरोजगाराचा विचार करण्यात येतो. सर्वानाच नौकरी हवी आहे. कारण तेथे सुरक्षितता प्राप्त होत असते. सर्व पर्याय संपल्यावर सर्वात शेवटी स्वयंरोजगाराची निवड करण्यात येते. त्याकरीता त्यांना समायोजनात्मक दृष्टिकोणातून विविध समस्यांना सामोरे जावे लागते.व्यवसाय करतांना सर्व भुमिका योग्यप्रकारे निभवाव्या लागतात. उच्च शिक्षित असुनही परीस्थितीनुसार वर्तनात बदल, मानसिकतेत बदल करण्यास तयार राहावे लागत आहे. मनाविरूध्द वागण्यास भाग पडावे लागते. त्यामुळे कित्येकदा निराशा पदरी पडतांना आढळते व मानसिक खच्चीकरण झाल्याने आत्महत्या सारख्या घटना घडतांना आढळतात. जीवन जगण्याकरीता आलेल्या परीस्थितीनुसार मतपरीवर्तन केल्यास, निर्णय परीस्थितीनुसार घेतले गेल्यास फायदयाचे ठरू शकते व योग्य समायोजन साधण्यास मदत होते.

**प्रस्तावना :**

अन्न,वस्त्र,निवारा या मानवाच्या प्राथमिक गरजा आहेत. या सर्व गरजा भागविण्याकरीता पैश्याची गरज आहे. शाळा, महाविद्यालय, विश्वविद्यालयातून पदवी प्राप्त लाखो लोक कामाच्या शोधात भरकटतांना आढळतात. आजकालचे युग हे स्पर्धात्मक व तंत्रज्ञानात्मक असल्याने शिक्षितांचे प्रमाण आधीच्या काळाच्या तुलनेत वाढलेले आढळते. सर्वत्र नौकरी करीता उच्च शिक्षितांचे प्रमाण वाढलेले आहे. शिक्षण प्राप्त उमेदवाराच्यां तुलनेत उपलब्ध नौकरीच्या जागा मात्र कमी आढळतात. त्यामुळे सर्वांना नौकरी लागणे अशक्य आहे.नौकरीची वाट पाहता पाहता अर्ध आयुष्य निघुन जाते. म्हणुनच आजकालचा युवक हा स्वयं:रोजगाराकडे वळतांना दिसतो आहे. शिक्षितांचे प्रमाण वाढल्याने बेरोजगारीची गंभिर समस्या देशासमोर उभी आहे.उच्च शिक्षण प्राप्त केल्यावरही त्या तोलामोलाची नौकरी प्राप्त होत नसल्याने युवकांना जीवनात निराशा प्राप्त होत आहे.त्यामुळे व्यवसाय विषयक समायोजनात्मक समस्या निर्माण होत आहे.युवकात न्युनगंड,नैराश्य,आत्महत्यांचे प्रश्न निर्माण होतांना आढळतात.ऑक्टोंबर २०२० भारतातील बेरोजगारीचा दर ६.९ टक्के झाला आहे.२०१४ मधे १४ कोटी बेरोजगार होते आता मात्र ३० कोटी बेरोजगाराची संख्या झाली आहे.

**परिभाषा :**

१. रोजगार नसलेल्या परंतु रोजगार मिळावा अशी इच्छा असणाऱ्या व्यक्तीला बेरोजगार म्हणतात.

२. डॉ. जे. ई. स्टेपनेक : "उद्योजकता धोका स्वीकारने की क्षमता, संघटन की योग्यता तथा उद्योग मे विविधता एवं नवनिर्मीती करने की तीव्र इच्छा इनका समावेश है."

३. अमेरिकन मानसशास्त्रज्ञ डी.सी.मॅक्लीलॅन्ड : "उद्योजकता ही नैसर्गिक देणगी म्हणजे जन्मजात गुण नसून कोणत्याही जाती, धर्म,पंथ व लिंगाची व्यक्ती उद्योजक होवू शकते.जन्मास आलेल्या प्रत्येक व्यक्ती मध्ये उद्योजकतेचे गुण कमी अधिक प्रमाणात सुप्त स्वरूपात असतो. त्याकरीता संधी मिळण्याची विशेष गरज असते."

**बेरोजगारीचे प्रकार :**

| | | | |
|---|---|---|---|
| १.खुली | २.हंगामी | ३. अदृश्य किंवा प्रच्छन्न | ४.कमी प्रतीची |
| ५.सुशिक्षित | ६.चक्रीय | ७.घर्षणात्मक | ८.संरचनात्मक |

**संशोधनाची गरज :**

बेकारी ही भारतासमोरी ज्वलंत समस्या आहे.त्यामुळे गुन्हेगारी, अत्याचार, संप, लुटमार, फसवेगिरी सारख्या समस्या बेकारीतूनच जन्मास आल्या आहेत. राष्ट्रातील नवयुवकांच्या दयनीय अवस्थांचा विचार करता राष्ट्राला प्रगतशील बनविण्यास घातक ठरू शकते. या समस्येचे निराकरण करण्यास संशोधनात्मक दृष्टिकोणातून अभ्यास होण्याकरीता या विषयाची निवड करण्यात आली.

**उद्दिष्टे :**

१. शिक्षण पध्दतीत सुधारणा करणे.

२. समाजाचा सुशिक्षित बेरोजगारांकडे बघण्याचा दृष्टिकोण बदलविणे.

३. कला विभागाच्या अंतर्गत असलेले उद्योग वाढविणे.

४. बेकारीचे कारणे शोधणे

**गृहितके :**

१. बेरोजगारीची समस्या उद्भवण्याचे कारण व्यावसायिक शिक्षणाचा अभाव आहे.

२. समाजाचा सुशिक्षित बेरोजगारांकडे बघण्याचा दृष्टिकोण हीन दर्ज्याचा असतो.

३. कला शाखेचे बेरोजगारांचे प्रमाण जास्त आढळले.

४. शिक्षण पद्धती रोजगार प्राप्त करू शकेल अशी नसणे, जीवन उपयोगी शिक्षणाचा अभाव व मनासारखा व्यवसाय प्राप्त न झाल्याने समायोजनाची समस्या निर्माण होते.

**संशोधनाचे क्षेत्र व मर्यादा :**

शहरी क्षेत्रात औद्योगिक व शिक्षित बेरोजगारी अशी दोन प्रकारची बेरोजगारी आढळते.संशोधनाकरीता भंडारा शहराची निवड करण्यात आली. संशोधन भंडारा शहरापुरतेच मर्यादित ठेवण्यात आले. कला शाखेपुरताच मर्यादित ठेवण्यात आले. पदवीप्राप्त युवकांचा वाढत्या लोकसंख्यांच्या तुलनेत नोकरी संबंधित तरतूदींचा अभाव आढळतो.

**संशोधन पद्धती :**

ऑनलाईन प्रश्नावलीच्या सहाय्याने तथ्य संकलन करण्यात आले. न्यादर्श पध्दतीने बहुस्तरीय नमुना निवड करण्यात आली. न्यादर्श प्रश्नावली बहुस्तरीय नमुना या प्रकारे निवड करण्यात आली.

**तथ्यसंकलन** :

कला शाखेतील ३० उत्तरदात्यांची निवड करण्यात आली.

**नमुना पद्धती व नमुना निवड :**

संशोधनाची उद्दिष्ट,माहिती संकलनाचे तंत्र, नियत्रंण तंत्र,व साधनक्षेत्र इ.अनेक प्रकारच्या आधारावर संशोधन पध्दतीचे वर्गीकरण करण्यात आले. सर्वेक्षण संशोधन पध्दतीचा वापर करण्यात आला.

**पूर्व संशोधनाचा आढावा :**

भारतात बिहार, उत्तरप्रदेश, मध्यप्रदेश, ओडिसा, झारखंड या राज्यात बेरोजगारीच्या समस्या निर्माण झाल्याने गुन्हेगारीकडे सहज वळु शकतात असा निष्कर्ष काढण्यात आला आहे. उच्च दर्ज्याचे कौशल्य असुनही हलके किंवा न्यून दर्ज्याचे कार्य करावे लागल्याने असमाधान,निरूत्साहामुळे उत्पादन दर्जा खालावलेला आढळला. सेंटर फॉर मॉनिटिरग ऑफ इंडियन इकॉनॉमी संस्थेचा अहवाल जाने.२०१७ ते एप्रिल २०१७ १५ लाख कामगारांच्या नोकऱ्या गेल्याचा निष्कर्ष काढला. मेक इन इंडिया योजना सरकारच्या नियोजन, पूर्वतयारी नसल्याने सफल ठरू शकली नाही.स्किल इंडिया कुशल कामगार निर्माण करू शकली नाही. डी व्ही. डबके १९९७,यांनी यवतमाळ येथिल सुशिक्षित बेरोजगार तरूण तरूणींच्या समायोजनात्मक समस्यांचा अभ्यास केला असता त्यांच्या निष्कर्षातून असे सिध्द झाले की, सुशिक्षित बेरोजगारी असणाऱ्या तरूणांची संख्या जास्त आहे तसेच कला शाखेतील बेरोजगारीचे प्रमाण जास्त असल्याचे आढळले. गृहउद्योग करणाऱ्यांचे प्रमाण तरूणीत देखिल जास्त आढळले. त्यामुळे तरूणी पेक्षा तरूणांचे बेरोजगारीचे प्रमाण हे जास्त असल्याचे आढळले.

**सांख्यकीय विश्लेषण :**

सुशिक्षित बेरोजगारांना सामाजिक समायोजन करतांना अनेक समस्या येतात. त्यांना कुटुंबात, समाजात जीवन विषयक गरजा असतात. यासारख्या विविध क्षेत्रात अडचणी येतात. त्यांच्या समस्या कोणत्या आहेत जाणून घेण्यास सुशिक्षित बेरोजगार तरूणींचा प्रश्नावली देवून त्यांची मते जाणुन घेवून त्यांचा ताण कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

१. बेरोजगारीची समस्या उद्‌भवण्याचे कारण व्यावसायिक शिक्षणाचा अभाव आहे.

मत दर्शक तक्ता

**(कला शाखेतील विद्यार्थीनींना विचारण्यात आले की, तुम्ही शिकत असलेल्या कोणत्या विषयाचा स्वयंरोजगार उभारण्यास मदत होते.)**

| अ.क्र | इंग्रजी | मराठी | इतिहास | भुगोल | अर्थशास्त्र | राज्यशास्त्र | समाजशास्त्र | गृहअर्थशास्त्र |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ३० | ... | ... | ०२ | ०२ | ०४ | ०२ | ०३ | १७ |
| | | | ६.६६ टक्के | ६.६६ टक्के | १३.३३ टक्के | ६.६६ टक्के | १० टक्के | ५६.६६ टक्के |

Co efficient of Range =0.79

वरील सारणी वरून असे निदर्शनास येते की,कला शाखेतील विद्यार्थीनींचे इतर विषयांचा स्वयंरोजगार करण्यास गृहअर्थशास्त्र विषयाच्या तुलनेत कमी हातभार लागतो. म्हणजेच गृहअर्थशास्त्र विषयाच्या विद्यार्थीनींना

स्वयंरोजगाराच्या संधीचे प्रमाण जास्त उपलब्ध असल्याचे निदर्शनास आले. इतर विषयाच्या तुलनेत गृहअर्थशास्त्र विषयाचा दर्जा स्वयंरोजगार प्राप्त करण्यास व स्वावलंबी बनण्याचा विस्तार हा जास्त असल्याचे निदर्शनास आले.यावरून असा निष्कर्ष निघतो की ५० टक्के उत्तरदाते व्यवसायाबाबत इतर विषयाच्या प्रशिक्षणाच्या अभावामुळे व्यवसायाकरीता सहाय्यक ठरू शकले नाही.

२. समाजाचा सुशिक्षित बेरोजगारांकडे बघण्याचा दृष्टिकोण हिन दर्ज्याचा असतो

**मत दर्शक तक्ता**

रोजगारा अभावी न्युनगंडतेची भावना निर्माण होते का.

| अ.क्र | होय | नाही |
|---|---|---|
| ३० | २० | १० |

रोजगारा अभावी न्युनगंडतेची भावना निर्माण होते का, विचारले असता न्युनगंडतेची भावना निर्माण होते कारण बेरोजगारांकडे बघण्याचा दृष्टिकोण हीन दर्ज्याचा असतो. समाजामधे वावरतांना हिन दर्जा दिल्या जाते सामाजीक दर्जा प्राप्त होत नाही. जीवन जगतांना स्थैर्य प्राप्त होत नसल्याने चिंतेचे वातावरण निर्माण होते. घरच्यांचा देखिल भावनीक आधार प्राप्त होत नाही. त्यामुळे मानसिक ताण निर्माण झालेला आढळतो. समाजात व्यवसाय करणाऱ्यांना दुय्यम स्थान दिल्या जाते. कारण व्यवसायात कधी जास्त फायदा तर कधी तोटा सहन करावा लागतो. परंतु मेहनत, जिद्द, चिकाटी, योग्य निर्णयक्षमता, प्रसंगावधानता या गुणांनी यशस्वी बनु शकतो. परंतु समाजात नोकरीलाच जास्त महत्व व योग्यता, दर्जा प्राप्त असल्याने स्वयंरोजगाराकडे कमी दर्जेच्या दृष्टिकोणातून पाहिल्या जाते. लग्न करतांना देखिल नौकरी असणाऱ्या वराचा प्रथम विचार करण्यात येतो. कोरोना सारख्या महामारीत व्यवसाय करणाऱ्या लोकांना सर्वात जास्त तोटा सहन करावा लागला. परंतु ज्या व्यावसायिकांनी समयसुचकतेचा वापर करून दैनंदीन उपयोगी वस्तुंचा व्यवसाय करण्याचा निर्णय घेवून यशस्वी देखिल ठरलेत.

३. करीयर म्हणून कशाची निवड कराल

**मत दर्शक तक्ता**

| अ.क्र | नोकरी | व्यवसाय |
|---|---|---|
| ३० | २२ | ०८ |

व्यवसाय म्हणुन निवड करण्यात येणाऱ्या उत्तरदात्यांचे प्रमाण हे नोकरीचा स्विकार करणाऱ्यांच्या तुलनेत कमी आढळले.यावरून असे सिध्द होते की, व्यवसाय स्वीकारण्यास तरूण दुय्यम स्थान देतात. तसेच त्यांच्यात व्यवसायाबाबत आत्मविश्वास कमी आढळला.

४. व्यवसाय म्हणून निवड करण्यात येणाऱ्या उत्तरदात्यांचे समाधान प्राप्ती बाबत निरीक्षण करण्यात आले.

मत दर्शक तक्ता

| अ.क्र | होय | नाही |
|---|---|---|
| ३० | १२ | १८ |

वरील सारणी वरून असे निदर्शनास येते की, यवसाय म्हणुन निवड करण्यात येणाऱ्या उत्तरदात्यांचे समाधान प्राप्ती होते असे मत दर्शविणारे प्रमाण हे कमी आढळले. म्हणजेच व्यवसाय स्विकारला तरी सूरक्षिततेचा व स्थैर्याचा अभाव असल्याचे मत दर्शविणाऱ्यांचे प्रमाण हे जास्त आढळले. उच्च शिक्षित असूनही नौकरी मिळत नसल्याने नाईलाजाने व्यवसायाची निवड करावी लागते असे मत दर्शविणारे आढळले.

५. बेरोजगाराचा कोणता प्रकार आहे.

मत दर्शक तक्ता

| **अ.क्र** | **अशिक्षित** | **सुशिक्षित** |
|---|---|---|
| ३० | ०६ | २४ |

वरील सारणी वरून असे निदर्शनास येते की, सुशिक्षित बेरोजगारीचे प्रमाण हे अशिक्षित बेरोजगाराच्या प्रमाणापेक्षा जास्त आढळले. यावरून असा निष्कर्ष निघतो की, सुशिक्षित बेरोजगारांना शिक्षणाच्या तुलनेत योग्य नोकरी प्राप्त होत नसल्याने बराच आयुष्याचा बराच कालावधी नोकरी लागण्याची वाट पाहण्यात जातो. त्यामुळे सुशिक्षित बेरोजगारीचे प्रमाण वाढलेले आढळते.

६. सामाजिक समायोजनास मदत होते का

मत दर्शक तक्ता

| **अ.क्र** | **होय** | **नाही** |
|---|---|---|
| ३० | ०६ | २४ |

**निष्कर्ष :**

बेरोजगारीची समस्या उद्‌भवण्याचे कारण व्यावसायीक शिक्षणाचा अभाव हा आढळला आहे.कला शाखेतील विद्यार्थीनींना इतर विषयानुसार स्वयं:रोजगाराबाबत संधीबाबत विचारले असता त्यांचे प्रमाण कमी आढळले त्यावरून असा निष्कर्ष निघतो की,विषयानुसार स्वयंरोजगार निर्माण होतील अश्या दृष्टिकोणातुन अभ्यासक्रमाचे आयोजन असावे जेणे करून स्वयं:रोजगाराबाबत शिकत असतांनाच ज्ञान व संधी उपलब्ध होवू शकेल. व बेरोजगारी टाळता येवू शकेल.

समाजाचा सुशिक्षित बेरोजगारांकडे बघण्याचा दृष्टिकोण हीन दर्ज्याचा असतो.समाजाच्या रूढी,परंपरा या ठरलेल्या असतात.मानव हा समाजशील प्राणी असल्या कारणाने तो समाजाशिवाय वेगळा राहू शकत नाही. समाजात नौकरी करणाऱ्या व्यक्तिला मानाचे स्थान असल्या कारणाने प्रथम स्थान नौकरीला दिल्या जाते व शेवटी व्यवसायाचा विचार करण्यात येतो. त्यामुळे करीयर निवडण्याकरीता नौकरीची निवड करणाऱ्यांचे प्रमाण व्यवसाय म्हणुन स्वीकारण्या पेक्षा हे जास्त आढळले.

कला शाखेचे बेरोजगारांचे प्रमाण जास्त आढळले. कला शाखेतील गृहअर्थशास्त्र विषया व्यतिरीक्त इतर विषयाचे बेरोजगारांचे प्रमाण हे जास्त आढळले.तर गृहअर्थशास्त्र विषयाअंतर्गत विविध कलाकौशल्याबाबत प्रशिक्षण दिल्या गेल्याने स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होत असल्याने या विषयात बेरोजगारीचा प्रश्न निर्माण होत नाही. इतर विषयात जीवनोपयोगी ज्ञानाचा व संधीचा प्रशिक्षणचा अभाव असल्याकारणाने कला शाखेतील बरेच विद्यार्थी हे बेरोजगार असल्याचे आढळते. `.

शिक्षण पध्दती रोजगार प्राप्त करू शकेल अशी नसणे,जीवन उपयोगी शिक्षणाचा अभाव व मनासारखा व्यवसाय प्राप्त न झाल्याने समायोजनाची समस्या निर्माण होते. समाजात स्वत:चे स्थान निर्माण करण्याकरीता आजकाल तरूणांना जास्त संघर्ष सहन करावा लागत आहे. प्राचीन काळात गुरूकुल पध्दतीचे शिक्षण उपलब्ध असल्याने जो पर्यंत शिष्य तरबेज होत नाहि तो पर्यंत घरी जाण्याची परवाणगी मिळत नसे.गुणांचा दर्जा चांगला असल्याने त्यानुसार कार्यप्रणाली ठरल्या जात होती. परंतु आताच्या शिक्षणामुळे योग्य ज्ञानाचा व संधीच्या अभावामुळे तरबेज विद्यार्थी घडु शकले नाहि.शिक्षणप्रणाली बेरोजगाराच्या समस्येचे कारण ठरले. उच्च शिक्षण सहज शक्य असल्याने ते सर्वांना प्राप्त करता आले परंतु त्यामानाने रोजगाराच्या संधी शासन उपलब्ध करू शकले नसल्यामुळे बेरोजगारीच्या समस्या देशाकरीता घातक ठरत आहे.जीवनोपयोगी शिक्षण काळाची गरज ठरत आहे.व्यवसायोपयोगी शिक्षण हे या काळात वरदान ठरू शकेल. मनासारखा व्यवसाय प्राप्त न झाल्याने ते कार्य यशस्वीपणे पार पाडले जात नाही दर्जा खालावलेला आढळतो.मानसिक समाधान प्राप्त होत नसल्याने उत्साह,कार्यशीलता कमी होते.त्यामुळे समाजात समायोजनाच्या समस्या निर्माण होतात. भविष्यात यांत्रिकीकरणामुळे बेरोजगारीचे प्रमाण वाढून रोजगार संधी ६९ टक्के कमी होणार आहे.

**उपाययोजना :**

उत्तम प्रशिक्षण आवश्यक, देशातील उद्योगाचे संरक्षण करणे, परकीय उत्पादनावर बहिष्कार टाकणे , स्वदेशी मालाचा वापरावर भर देणे, शासनाने निर्यातीवर भर देणे आवश्यक आहे.

**स्वयं:रोजगारा करिता आवश्यक गुण :**

१. ध्येय निश्चिती, २. उपक्रमशीलता ३. साहस ४. आत्मविश्वास
५. निर्णय घेण्याची क्षमता ६. संघर्ष करण्याची तयारी ७.जबाबदारी ८. आत्मपरीक्षण
९. संघटन कौशल्य १०. प्रामाणिकता ११. कुटूंबांचे सहकार्य १२. तांत्रिक ज्ञान
१३. व्यवस्थापन कौशल्य १४. दुरदृष्टी १५. कल्पकता १६.स्वयंशिस्त
१७. विनोदबुध्दी १८.धेर्य १९. स्वत:बद्दलच्या व्यावहारीक कल्पना २०. उपक्रमशीलता व स्वतंत्र बुध्दी २१. प्रश्नाची उकल करण्याची ताकद २२.आव्हाने स्वीकारण्याची तयारी व सभोवतालच्या परिस्थितीची जाणीव २३. व्यापार व अर्थशास्त्र ज्ञान

**उद्योजकाचे कार्य :**

**१.** व्यवसायात मालक म्हणून कार्य करणे.

१. भांडवलाचा पुरवठा करणे
२. व्यवसायाचे नियत्रंण करणे.
३. जबाबदारी स्वीकारणे
४. उत्पादनाच्या घटकात समन्वय निर्माण करणे.
**५.** भविष्य काळाकरिता आगाऊ अंदाज बांधण्याचे कार्य करणे.

नाविण्यता ,अविष्कार,नफा जास्त प्राप्त करणे,आर्थिक व भौतिक साधनांचा जास्त वापर, बाजारपेठेवर प्रभुत्व संपादन करणे,उत्पादन शक्ती,क्षमता वाढविण्यास प्रयत्न करणे,कामगाराचे हित लक्षात घेवून कार्यक्षमता वाढविण्यास प्रयत्न करणे.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१. डॉ. वसू सुनंदा आणि डॉ. मेहरे रजनी : गृहव्यवस्थापन आणि आंतरिक सजावट,श्री.साईनाथ प्रकाशन,नागपूर,पेज नं. १४५ते १५१
२. प्रा. घाटोळे रा.ना.,समाजशास्त्रीय संशोधन तत्वे आणि पध्दती, श्री.शांतादुर्गा निवास २३रामदासपेठ, नागपूर
३. प्रा. पालीवाल राधाकृष्ण, भारताचे आर्थिक प्रश्न आणि नियोजन, श्री.शांतादुर्गा निवास २३ रामदासपेठ,नागपूर
४. डॉ. देशमुख, प्रभाकर, उद्योजकता विकास संकल्पना आणि व्यवहार,पिंपळापुरे ॲण्ड पब्लिशर्स,महाल,नागपूर.
५. डॉ. जोशी, जयंत, पिंपळापुरे ॲण्ड पब्लिशर्स, महाल,नागपूर.
६. दै.लोकमत, सुशिक्षित बेरोजगाराच्या समस्या
७. loksatta.com
८. http://ese.mah.nic.in
९. orfonline .org
१०. prahaar.in